पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक: ०५/०३/२०२१**

# जीवे ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस ०५ वर्ष सश्रम कारावास व ७००० हजार रू. दंडाची शिक्षा.

स्वत:चे राहते घरी झोपली असलेल्या महीलेस जीवानिशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस दिनांक ०४/०३/२०२१ रोजी मा. न्यायालयाने ०५ वर्ष सश्रम कारावास व ७०००/- रु. दंडाची शिक्षा सुनावली आहे. प्राप्त माहीती नुसार आरोपी नामे राकेश विष्वनाथ बोगा रा. मोहटोला ता. आरमोरी जि. गडचिरोली व यातील जखमी महीला यांची एकमेकांशी ओळख असल्यामुळे दिनांक १४/०२/२०१८ रोजी रात्रो २ ते ३ वाजेदरम्यान महीला आपले राहते घरी झोपली असतांना, आरोपी याने सदर महीलेच्या घरी जावुन, माझ्यामागे दोन पोलीस लागलेले असुन, माझ्याकडे मोठया प्रमाणात असलेला दारुचा साठा तुझ्या घरी ठेवु दे असे म्हणाला असता, सदर महीलेने आपले घरी दारुसाठा ठेवण्यास नकार दिल्याचे कारणावरुन आरोपीने सदर महीलेशी भांडण केले, त्यामुळे महीलेने आपल्या घराचे दार लावुन झोपी गेली असतांना अर्ध्या तासानंतर परत आरोपीने महीलेचे घरी जावुन ती झोपेत असतांना तीच्या डोक्यावर जोराने मारल्याने ती जागी झाली. तेव्हा आरोपी राकेश बोगा याने तीला कुऱ्हाडीचे दांडाने मारले. त्यामुळे महिला जोरात ओरडल्याने तीचा मुलगा जागा झाला तेव्हा आरोपीने महीलेस डोक्यावर व कानाच्या जवळ मारुन गंभीर जखमी केले होते.

सदरबाबत जखमी महीलेच्या भावाने दिनांक- १४/०३/२०२१ रोजी पोस्टे आरमोरी येथे फिर्याद दाखल केली. पोस्टे आरमोरी येथे अप. क्र. ४०/२०१८ कलम ३०७,४५२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करुन तपासात घेतला. गुन्हयाचा तपास पोनि. महेश पाटील पोस्टे आरमोरी यांनी पुर्ण करुन मा. जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आला. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने से.के क्र. ६०/२०१८ अन्वये केस मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय गडचिरोली यांचे न्यायालयात खटला चालविण्यात आला.

मा. न्यायालयाने फिर्यादी व साक्षीदारांचे बयान नोंदवुन आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने व सरकारी वकीलाच्या युक्तिवाद ग्राहय धरुन मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली श्री स्वप्नील एस. खटी यांनी आरोपीस क्र. ३०७ भादंविमध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व ७,०००/- रु. दंड व कलम ४५२ भादंविमध्ये ५ वर्ष सश्रम कारावास व २,०००/- रू. दंड असे एकुण १० वर्ष सश्रम कारावास व ९,०००/- रू. दंडाची शिक्षा सुनावली.

सदर गुन्हयाचा तपास पोनि. महेश पाटील पोस्टे आरमोरी यांनी केला असुन सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री एस. यु कुंभारे व श्री एन. एम. भांडेकर यांनी बाजु मांडली. कोर्ट पैरवी म्हणुन पोउपनि. नारायण बच्चलवार यांनी काम पाहिले.

मा. पोलीस अधीक्षक श्री अंकित गोयल सा़ो. यांनी तपासी अधिकारी व त्यांच्या संपुर्ण टीमचे अभिनंदन केले.